आयातकर कार्यालय,
पुणे महानगरपालिका
जा.क्र./ओ १३०६६
दिनांकः-२९/०३/२०११

## कार्यालय परिपत्रक

पुणे महानगरपालिका जकातकर नियमावली २००८ चे प्रस्तावास मा. महानगपालिका मुख्य सभा ठराव क्र. २८ दि. २३/०४/२००८ ने मान्यता मिळाली आहे. सदर प्रस्तावास माहाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. पी.एम.सी. ३००८ /७३३/प्र.क्र.२५४/२००८/न.वि-२२ दि. ०६/०५/२००८ रोजी मान्यता मिळाली आहे. सदर नियमावलीची अंमलबजावणी दि. ०५/०६/२००८ मध्यरात्री १२.०० नंतर म्हणजेच दि. ०६/०६/२००८ पासून करण्यात आली आहे.

सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षासाठी किमान व कमाल दरांतर्गत सोबतच्या यादीनुसार मुळ अनुसुची १ (नियम ४) मधील अ. क्र. १३ व २५ मधील मालाच्या जकात कराच्या कमाल दरास मा. मुख्य सभा ठराव क्र.४७१, दि.११/०२/२०११ अन्वये मान्यता दिली आहे. सदरच्या दर बदलाच्या कार्यवाहीस मा. अति. म.आ. ठ.क्र ८/७५० दि. २९/०३/२०११ ने मान्यता दिली आहे. त्यानुसार सोबतच्या यादीमधील जकातपात्र मालाच्या दर बदलाची अंमलबजावणी दि. ०१/०४/२०११ (दि. ३१/०३/२०११ मध्यरात्री ००.००) पासून करावयाची आहे. त्यानुसार **बदललेल्या दराबाबत संगणक प्रणालीमध्ये योग्य ते बदल करण्यात आलेला आहे.** जकातकर दराची अंमलबजावणी करताना जकात नाक्यामधील सर्व कर्मचाऱ्यांनी सोबतच्या यादीमधील जिन्नसाची नविन दरानुसार उगवणी करणेबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे.

ज्या जकात नाक्यांवर हाताने (मॅन्युअली) पासेस केले जातात अशा जकात नाक्यांवर सोबतच्या यादीत नमुद केलेल्या मालाची बदललेल्या दराने जकात कराची उगवणी करण्यात यावी.

तरी नाका सुपरवायझर/नाकाधिकारी/नाका निरीक्षक/नाका लेखनिक/नाका शिपाई यांनी बदलाची नोंद घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करावी. आपले माहितीसाठी सन २०११-१२ या सालाकरीता अनुसुची १ (नियम ४) मधील अनुक्रमांक १३ व २५ मधील बदलण्यात आलेल्या दराबाबतच्या तीन प्रती या कार्यालयीन परिपत्रकासोबत पाठवित आहोत. जकात कर नियम २००८ मधील **नियम क्र. ६ जकात कराचे दर प्रदर्शित करणे** यानुसार जकातकर दर बदलाच्या प्रती पुठ्ठ्यावर डकवून त्या आयातदारांना पाहणेसाठी नाक्याच्या दर्शनी भागात लावण्यात याव्यात.

आयातकर प्रमुख
पुणे महानगरपालिका

प्रत:- १) मा. मुख्य लेखापरिक्षक
२) मा. प्राप्ती व चाचणीचे अर्थान्विक्षक
३) आयातकर अधिक्षक, सहा. आयातकर अधिक्षक क्र. १ ते ६
नाका सुपरवायझर/नाकाधिकारी/नाका निरीक्षक/नाका लेखनिक/नाका शिपाई
गस्तीपथक समन्वयक, भरारी पथक

जावक क्रमांक ओ/१३०६८ दिनांक:-२९/०३/२०११

## खालील जिन्नसांची दि.०१/०४/२०११ पासून कमाल दराने उगवणी करणे.

| परिशिष्ठ | | | | |
|---|---|---|---|---|
| अनुसुची १(नियम ४) मधील | | | | |
| जकात पात्र मालाचे वर्णन आणि त्याचे किमान व कमाल दर आणि सन २०११-१२ या वर्षासाठी मान्य दर | | | | |
| मुळ अनुसूची १ मधील क्रमांक | जिन्नसाचे नांव | किंमतीवर शेकडा | | |
| | | किमानदर रुपये | कमालदर रुपये | सन २०११-१२ या वर्षासाठी मान्य केलेला दर |
| १३ | चांदीचा लड्डा, चांदीची भांडी, चांदीचे दागिने, चांदीचे पत्रे, चांदीचे सर्व प्रकारचे इतर जिन्नस | ०.३५ | १.०० | १.०० |
| २५ | सोने बुलियन, चिपा प्रायमरी गोल्ड, बिस्किट, रॉ फॉर्म, सोन्याची लगड, सोन्याचे दागिने, प्लॅटीनम, पप्रसिएस मेटल, हिरे, अमेरिकन डायमंड, सोन्याची भांडी, ज्वेलरी, वस्तू व सोन्याचे इतर जिन्नस | ०.३५ | ३.०० | ३.०० |

आयातकर प्रमुख
पुणे महानगरपालिका